मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेचा हजार ८६७६ कोटींचा अर्थसंकल्प सादर!

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणतीही करवाढ, दरवाढ नाही

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

श्रीमंत' पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सन २०२४-२५- या आर्थिक ( झउचउ ) वर्षांचा मूळ ५ हजार ८४१ कोटी ९६ लाख तर केंद्र, राज्य सरकारच्या पुरस्कृत ( झउचउ ) योजनांसह ८ हजार ६७६ कोटी ८० लाख रुपयांचा अर्थसंकल्प आज (मंगळवारी) सादर झाला. आगामी लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणतीही करवाढ, दरवाढ करण्यात आलेली नाही. विशेष सभेमध्ये महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना अर्थसंकल्प सादर केला. प्रशासकांनी अर्थसंकल्पाला तात्काळ मान्यता दिली. महापालिकेचा हा ४२ वा अर्थसंकल्प आहे. तर, आयुक्त सिंह यांचा दुसरा अर्थसंकल्प आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप उपस्थित होते.शहरातील विकास योजनेतील सुमारे ६१ कि.मी. लांबीचे रस्ते विकसित करण्यात येणार ( झउचउ ) आहेत. त्यातील काही रस्ते डांबरीकरण, काही रस्ते कॉंक्रीटीकरण तर काही रस्ते णऑलरप डींॲशशीं ृशीळसप नुसार विकसित करण्याचे आराखडे तयार करण्यात आले आहेत. महापालिका हद्दीमधील वाकड, पुनावळे, ताथवडे, पिंपळे सौदागर, चिखली, जाधववाडी, बो-हाडेवाडी, मोशी , च-होली, तळवडे, दिघी, डुडुळगाव, वडमुखवाडी, कुदळवाडी या भागातील रस्ते विकसित करण्याचे नियोजन आहे. यामध्ये रस्त्यासोबतच पाणीपुरवठा, जलनिःसारण नलिका टाकणे, विद्युत दिव्यांची व्यवस्था करणे युटीलिटी डक्ट टाकणे इ. सोई सुविधा देणेत येणार आहेत.



### मैलाशुद्धीकरण प्रकल्प

» अमृत १.० योजने अंतर्गत पिंपळे निलख येथे १५ द.ल.लि, चिखली येथे १२ द.ल.लि. व बोपखेल येथे ५ द.ल.लि. क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्रे बांधण्याचे नियोजन आहे. अमृत २.० योजने अंतर्गत भोसरी येथे ५ द.ल.लि., वाल्हेकरवाडी येथे ४ द.ल.लि. व केशवनगर येथे ४ द.ल.लि. क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्रे बांधण्याची कामे तसेच कस्पटेवस्ती, चिखली येथे संप व पंप हाऊस बांधणे आणि काळेवाडी पंप हाऊस ते भाटनागर डद्धझ पर्यंत पाईपलाईन टाकणे ही कामे कार्यन्वित असून या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे उद्धिष्ट आहे. ताथवडे येथे पशुसंवर्धन विभागाच्या जागेमध्ये २० द.ल.लि. क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणेचे काम नियोजित आहे. प्रकल्पांना केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त होणार आहे.शहरामधून वाहणा-या इंद्रायणी, पवना व मुळा या नद्यांचे होणारे प्रदुषण कमी होणार आहे.

### अर्थसंकल्पात काय आहे?

- » विकास कामासाठी १८६३ कोटी तरतूद
- » स्थापत्य विशेष योजनांसाठी १०३१ कोटी
- » शहरी गरिबांसाठी १८९८ कोटी
- » महिलांच्या विविध योजनांसाठी ६१ कोटी
- » दिव्यांग कल्याकणारी योजना ६५ कोटी

पाणीपुरवठा २६९ कोटी

- » भूसंपादनाकरिता १०० कोटी रुपयांची तरतूद आहे
- » अतिक्रमण निर्मूलन व्यवस्थेसाठी १० कोटी
- » अमृत २ योजनेसाठी ३० कोटीआठ
- » क्षेत्रीय कार्यालयासाठी १९० कोटी निधी
- » अ क्षेत्रीय कार्यालय २३.२६ कोटी.
- » ब क्षेत्रीय कार्यालय ११.७६ कोटी.
- » क क्षेत्रीय कार्यालय २१.६६ कोटी.
- » ड क्षेत्रीय कार्यालय ३८.४३ कोटी.
- » इ क्षेत्रीय कार्यालय १३.०२ कोटी.
- » फ क्षेत्रीय कार्यालय – ३५.२५ कोटी.
- » ग क्षेत्रीय कार्यालय १६.५१ कोटी.
- » ह क्षेत्रीय कार्यालय २३.०७ कोटी सुविधा प्रकल्प

अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार रस्ते विकसित करणार महत्वाचे रस्ते अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणेत येणार आहे. यामध्ये पादचा-यांसाठी सुसज्ज समपातळीतील पदपथ, सायकल स्वारांकरीता सुरक्षित सायकल मार्ग, नागरीकांना बसणेकरीता बैठक व्यवस्था, दिशादर्शक फलक इ. गोष्टींचा समावेश करणेत आलेला आहे. यामुळे शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी ते हॅरीस पुल, दापोडी-लांबी ६.७० कि.मी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी ते भक्ती शक्ती चौक, निगडी-लांबी ६.४० कि.मी, बिर्ला हॉस्पीटल चौक ते डांगे चौक-लांबी १.६५ कि.मी, कुणाल आयकॉन रस्ता, पिंपळेसौदागर-लांबी १.७८ कि.मी, आकुर्डी गुरुद्वारा चौक ते राजयोग कॉलनी- लांबी ०.८ कि.मी, वाकड येथील दत्तमंदिर रस्ता लांबी १.७६ कि.मीमहापालिका हद्दीतील चिंचवड येथील आरक्षण क्रमांक १८१ ड बिजनेस सेंटर साठी आरक्षित जागेत ( झउचउ ) संकल्पना करा, बांधा, अर्थ पुरवठा करा, चालवा आणि हस्तांतरित करा (ृइऋझढ) यातत्वावर सिटी सेंटर विकसित करण्याचे नियोजन आहे. यामध्ये रिटेल्स , हॉटेल्स , सर्व्हीस अपार्टमेंट, शॉपिंग सेंटर विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे शहराचे नाव लौकिकात भर पडण्यास मदत होणार आहे. मोशी स्टेडियम :- मोशी येथील सर्व्हे नं.४३५ येथे २५०० आसन क्षमतेचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बहुउद्देशीय क्रीडा संकुल उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे शहरातील क्रीडा सुविधामध्ये मोठी भर पडणार आहे. कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे क्लब निर्माण करण्याच्या उद्देशाने इजढ तत्त्वावर अण्णासाहेब मगर स्टेडियमचे विकास करणेचे नियोजित आहे.मुळा नदीवरील सांगवी-बोपोडी पुल बांधण्यात येणार आहे. या १८.०० मीटर रुंदीच्या पुलामुळे सांगवी व पुणे महापालिका हद्दीतील बोपोडी या भागातील नागरिकांचे दळण वळण सोयीचे होणार असून त्यामुळे इंधन व वेळेची बचत होणार आहे. पिंपरी डेअरी फार्म येथे रेल्वेवरील उड्डाणपुल बांधण्यात येणार आहे. पुलामुळे पुणे मुंबई रस्त्यावरुन पिंपरी गाव, पिंपळे सौदागर तसेच वाकड, हिंजवडी या भागात जाणेकरीता नागरीकांना विना अडथळा जवळचा मार्ग उपलब्ध होणार असुन वाहतुक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावर रक्षक चौक येथे सबवे बांधण्यात येणार आहे. किवळे रस्त्यावरील रक्षक चौकामध्ये मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असून रस्ता ओलांडणे धोकादायक झाले आहे. या ठिकाणी अंडरपास बांधल्यानंतर होणा-या वाहतुक कोंडीचे नियंत्रण होऊन पादचा-यांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडणेस मदत होणार आहे.

# महापालिका आयुक्तांना 'चष्मा' भेट देण्याचा प्रयत्न

## संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना सुरक्षारक्षकांनी अडवले



**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** वाकडमधील तब्बल दीड हजार कोटी रुपयांच्या टीडीआर घोटाळ्या प्रकरणी संभाजी ब्रिगेड या सामाजिक संघटनेकडून महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर गेल्या पंधरा दिवसांपासून महापालिके समोर बेमुदत साखळी उपोषण करण्यात येत आहे. परंतू महापालिकेत ये-जा करणाऱ्या आयुक्तांना सदरील आंदोलन दिसत नसल्याने त्यांना आंदोलन दिसावे, आणि त्यांनी या घोटाळ्यात सहभागी असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी यासाठी आयुक्तांना जाड भिंगाचा 'चष्मा' भेट देण्यासाठी गेलेल्या संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना सुरक्षारक्षकांनी अडवले. यावेळी संभाजी ब्रिगेडच्या वतीने' 'ठिय्या आंदोलन' करण्यात आले. दरम्यान वाकडमधील टीडीआर घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड व इतर दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, यासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने दोन महिन्यांपासून प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतू दखल घेतली न गेल्याने गेल्या दिवसांपासून महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर 'बेमुदत साखळी उपोषण करण्यात येत आहे. परंतू महापालिकेत ये-जा करणाऱ्या आयुक्तांना मात्र सदरील आंदोलन दिसत नसल्याने त्यांना आंदोलन दिसावे,आणि त्यांनी या घोटाळ्यात सहभागी असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी यासाठी आयुक्तांना जाड भिंगाचा 'चष्मा' भेट देण्यात येईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतिश काळे यांनी दिला होता. आज आयुक्तांना जाड भिंगाचा 'चष्मा' भेट देण्यासाठी गेलेल्या संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना महापालिकेच्या सुरक्षारक्षकांनी अडवले. यावेळी संभाजी ब्रिगेडच्या वतीने' 'ठिय्या आंदोलन' करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी संभाजी ब्रिगेडच्या शिष्टमंडळाची भेट घेत 'या घोटाळ्यासंदर्भात आयुक्तांशी चर्चा करून, योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले.या आंदोलनात संभाजी ब्रिगेड शहराध्यक्ष सतीश काळे, जिल्हाध्यक्ष गणेश दहिभाते, जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, जिल्हाउपाध्यक्ष ज्ञानदेव लोभे, जिल्हा सचिव वैभव जाधव, जिल्हा उपाध्यक्ष शहर रावसाहेब गंगाधरे, शहर सचिव महेश कांबळे, निलेश शेंडगे, वीर भगतसिंह विध्यार्थी परिषदचे नकुल भोईर, सामाजिक कार्यकर्ते दीपक खैरनार, विशाल सरोदे, संदीप नवसुपे,जिजाऊ ब्रिगेडच्या कल्पना गिड्डे, वसंत पाटील, संतोष शिंदे, अभिषेक गायकवाड, किरण खोत, प्रफुल्ल वाघमारे, जनार्दन देठे आदी जणांनी सहभाग घेतला होता. दरम्यान वाकडमधील टीडीआर घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड व इतर दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, यासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने दोन महिन्यांपासून प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतू दखल घेतली न गेल्याने गेल्या दिवसांपासून महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर 'बेमुदत साखळी उपोषण करण्यात येत आहे. परंतू महापालिकेत ये-जा करणाऱ्या आयुक्तांना मात्र सदरील आंदोलन दिसत नसल्याने त्यांना आंदोलन दिसावे,आणि त्यांनी या घोटाळ्यात सहभागी असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी यासाठी आयुक्तांना जाड भिंगाचा 'चष्मा' भेट देण्यात येईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतिश काळे यांनी दिला होता.

# राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाची महापालिका आयुक्तांना नोटीस

## अन्यथा मनपा आयुक्त कार्यालयासमोर पुढील आठ दिवसानंतर तीव्र आंदोलन

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** प्रलंबित वारसा नोकरीप्रकरण, अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या बढत्या, मनुष्यबळाचा वापर करून नालेसफाई करणे, नालेसफाई करताना मृत्युमुखी पडलेल्या कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्याकामी होणाऱ्या दिरंगाई प्रकरणी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने विभागीय महापालिका आयुक्तांना नोटीस बजावली आहे. १५ दिवसांत उत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.महापालिका आरोग्य विभाग तक्रार निवारण समितीचे माजी उपाध्यक्ष ॲड. सागर चरण म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये बऱ्याच वर्षांपासून वारसा नियुक्तीची प्रकरणे, महापालिका प्रशासन दिशाभूल करत वारसांना नोकरी हक्कापासून वंचित ठेवत आहेत.कर्मचाऱ्यांच्या



बढत्यांमध्येही दफ्तर दिरंगाई केली जात आहे. भारत डावकर या दिवंगत कामगारांच्या कुटुंबीयांना महापालिकेकडून मोफत घर, नोकरी, कुटुंबीयांचे पुनर्वसन, मुलांना मोफत शिक्षण देण्याकामी हलगर्जीपणा केला जात आहे. महापालिका प्रशासन दिशाभूल करत वारसांना नोकरी हक्कापासून वंचित ठेवत आहेत. त्याची दखल राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने घेत महापालिका आयुक्त यांना नोटीस बजावली आहे.प्रलंबित वारसा नोकरीप्रकरण, अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या बढत्या, मनुष्यबळाचा वापर करून नालेसफाई करणे, नालेसफाई करताना मृत्युमुखी पडलेल्या कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्याकामी होणाऱ्या दिरंगाई प्रकरणी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने विभागीय महापालिका आयुक्तांना नोटीस बजावली आहे. १५ दिवसांत उत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.महापालिका आरोग्य विभाग तक्रार निवारण समितीचे माजी उपाध्यक्ष ॲड. सागर चरण म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये बऱ्याच वर्षांपासून वारसा नियुक्तीची प्रकरणे, महापालिका प्रशासन दिशाभूल करत वारसांना नोकरी हक्कापासून वंचित ठेवत आहेत.

# फलटणचा पाणी चोर कोण?

## हिंमत असेल तर नाव सांगा, सुळेंचं फडणवीसांना खुलं आव्हान

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

एक महिन्यापूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस फलटणला गेले होते. त्यावेळी त्यांनी एक आरोप केला होता. देवेंद्र फडणवीस म्हणत होते की, या भागात पाणी चोर आहे. या पाणी चोरीवर मी बंदी आणणार आहे. २३ वर्षे पाणी चोरी चालली. आता ही चोरी मी बंद करणार आहे. मी लोकप्रतिनिधी आणि महिला म्हणून जाहिर प्रश्न विचारते की, तुम्ही फलटणमध्ये म्हणालात की,. २३ वर्षे येथे पाण्याची चोरी होते. कोणत्या पाण्याची चोरी होते. कोण करतय. गेल्या साडेसहा वर्षात चोरी होत होती. मात्र, अस काय झालं की, २३ वर्षांची चोरी आठवली. तुमच्यात हिंमत असेल तर नाव घेऊन बोला आणि कोठे पाणी चोरी होत आहे, हेही जाहिर करा'', असं खुलं आव्हान सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. पुरंदर तालुक्यात शरद पवार



गटाचा कार्यकर्ता मेळावा पार पडला. यावेळी खासदार सुप्रिया सुळे (डीॅअॅळूर डीश्रश) बोलत होत्या. सुप्रिया सुळे म्हणाल्या, गुंजवडीचा पाण्याचा तुम्ही उल्लेख केला. एक महिन्यापूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस फलटणला गेले होते. त्यावेळी त्यांनी एक आरोप केला होता. तो आरोप जास्त चर्चिला गेला नाही. फक्त वर्तमान पत्रात एकदिवस आला. चॅनल्सवरही एकदा दिवस आला असेल. देवेंद्र फडणवीस म्हणत होते की, या भागात पाणी चोर आहे. या पाणी चोरीवर मी बंदी आणणार आहे. २३ वर्षे पाणी चोरी चालली. आता ही चोरी मी बंद करणार आहे. २३ वर्षे एक माणूस चोरी करतोय. तुम्ही या आधी या राज्याचे मुख्यमंत्री होता. गृहमंत्रीही राहिलेले आहात. मग ते पाच वर्ष काय डोळे झाकून बसले होतात का? असा सवाल शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीसांना केला आहे. देवेंद्र फडणवीसांचं कस आहे खडा टाकायचा आणि पळून जायच, अशी टीकाही सुळे यांनी केली. यावेळी देवेंद्र फडणवीसांचा आण्णाजी पंत म्हणून सुळेंनी उल्लेख केलाय. मी रोज त्यांच्यावर हल्ला चढवते. मात्र, आता त्यांच्याकडून काहीच टीका होत नाहीत. त्यांना माझा वाईटपणा घ्यायचा नाही ते दुसऱ्यांना बोलायला लावतात. मी ठरवलंय महाराष्ट्रात कोणाशी लढणार नाही. माझी महाराष्ट्रात कोणाशी लढाई नाही. माझी लढाई दिल्लीशी आहे. मेरिटवर आहे त्याच्याशी लढायच. इथ लढण्यात पॉईंट नाही. कारण स्क्रिप्ट तेच लिहित आहे. अदृश्य शक्तीशी लढूयात. प्रश्नाच्या मुळावर जाव लागत, असेही सुळे यांनी यावेळी बोलताना नमूद केले. फलटण तालुक्याला २३ वर्षांनी हक्काचं पाणी मिळतंय, अनेक प्रकारच्या चोऱ्या पाहिल्या, पण पाण्याची चोरी पाहिली नव्हती. मी राज्याचा गृहमंत्री असल्यानं चोरी केलेल्याला पकडण्याचं काम माझ्या खात्याचं आहे, त्याला आम्ही पकडूच. फलटण तालुक्याचं पाणी वळवून आपल्या मतदारसंघात नेल्याचा आरोप पश्चिम महाराष्ट्राच्या एका मोठ्या नेत्यावर नेहमी होतो. त्यालाच अनुसरून फडणवीसांनी ही बोचरी टीका केली होती उपमुख्यमंत्रभी देवेंद्र फड़णवीस (वर्शींशपवअॅर षरवपरींळी) यांनी आज सातारा जिल्ह्यातील फलटणमध्ये मोठं वक्तव्य केलं. फलटण तालुक्याला २३ वर्षांनी) हक्काचं पाणी मिळतंय, अनेक प्रकारच्या चोऱ्या पाहिल्या, पण पाण्याची चोरी पाहिली नव्हती, असं फडणवीस म्हणाले. मी राज्याचा गृहमंत्री असल्यानं चोरी केलेल्याला पकडण्याचं काम माझ्या खात्याचं आहे, त्याला आम्ही पकडूच, असंही ते पुढे म्हणाले.

### पैशाची चणचण भासणार नाही


**» २३ वर्षानंतर या तालुक्याच्या हक्काचे पाणी या तालुक्याला प्राप्त होत आहे. नेहमी लोकं उन्हात आणि नेते सावलीत असतात पण आज नेते आणि लोकं दोन्ही उन्हात आहेत. ज्याला दुष्काळी म्हटले त्याचा डाग मिटण्याचे काम करणार आहोत, आज हक्काचे पाणी मिळणार आहे. आज फलटणमध्ये रामायणाचा नवा अध्याय सुरु करत आहोत. नरेंद्र मोदींच्या राज्यात नवीन अध्याय सुरू होतो आहे. येत्या काळात नवीन भारत आणि महाराष्ट्र उभा राहणार आहे. अनेक प्रकारच्या चोऱ्या ऐकल्या होत्या पण पाण्याची चोरी पाहायला मिळाली नाही. गृहमंत्री मीच आहे जो कुणी चोरली त्याला दंड करण्याची जबाबदारी आमची आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. गेल्या १३ महिन्यात आपण ८ योजनांना मान्यता दिली.**

# शहर बनतंय ड्रग्स कॅपिटल; ११०० कोटींचं मेफेड्रॉन जप्त

## तरुणांना 'किक' बसवणारं मेफेड्रॉन नेमकं आहे तरी काय?

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने पुण्यात तब्बल ११०० कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त केल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. प्रकरणी आतापर्यंत तीन जणांना अटक केली असून त्यांच्याकडून ६५० किलो पेक्षा अधिक वजनाचे मेफेड्रॉन म्हणजेच एमडी सापडले आहे. या संपूर्ण प्रकरणाचे धागेदोरे फक्त देशातच नसून इतर देशात देखील पोहोचलेले आहे याचा सखोल तपास सुरू आहे मात्र शिक्षणाच्या माहेर घरात एवढे किमतीचे ड्रग्स कोण आणतयं हा प्रश्न या निमित्ताने उपस्थितीत होऊ लागला आहे.पुणे पोलिसांनी अमली पदार्थ तस्करी करणाऱ्या गुंडांसह तिघांना अटक केल्यानंतर सोमवारी रात्री उशीरा




विश्रांतवाडीतील मिठाच्या गोदमात छापा टाकून तसचं कुरकुंभ मधून एकूण ११०० कोटी रुपयांपेक्षा आधिक मेफेड्रोन म्हणजेच एम डी जप्त केलं आहे. वैभव उर्फ पिंट्या भारत माने, अजय करोसिया आणि हैदर शेख अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. यातील हैदरने पुण्यातील विश्रांतवाडी भैरावनगर या परिसरात एका गोदामात मिठाच्या पोत्यात मेफेड्रोन लपविले होते. पोलिसांनी १०० ते २०० पोत्यांची तपासणी केली असता हैदरने मिठाच्या पोत्यात लपवलेले ५० किलो पेक्षा मेफेड्रोन मिळून आले. कोणाला संशय येणार नाही अशा लोकवस्तीत हैदर ने हे गोदाम भाड्याने घेतलं होतं. ऑक्टोबर पासून हैदर याठिकाणी मिठाच्या पाकिटात ड्रग्स लपवून ठेवत असे.पुण्याच्या पाठोपाठ कुरकुंभ एमआयडीसी येथील एका कारखान्यातून ५५० किलो एम डीचा साठा जप्त करण्यात आला असून एकूण ६५० किलो एम डी ज्याची किंमत ११०० कोटी रुपये एवढा मुद्देमाल पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने जप्त केला आहे. नायजेरीयन नागरिकाने एम डी ड्रग्स दिले होते. या ''प्रीमियम'' एम डी ड्रग्स ची किंमत कोट्यवधी रुपयांपर्यंत आहे. अंतराष्ट्रीय बाजारात ५०० ग्रॅम एम डी ची किंमत तब्बल १ कोटी रुपये इतकी आहे.

# बारावीची परीक्षा आजपासून; गैरप्रकार रोखण्यासाठी व्यापक उपाययोजना

## प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण ऑनलाइन प्रणालीद्वारे नोंदवण्याचा निर्णय

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

राज्य मंडळातर्फे घेण्यात येणारी बारावीची परीक्षा आज, बुधवारपासून सुरू होत असून ती १५ लाख १३ हजार ९०९ विद्यार्थी देणार आहेत. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रश्नपत्रिकेचे लिफाफे ताब्यात घेतल्यापासून प्रश्नपत्रिका वितरित करेपर्यंतचे चित्रीकरण करण्यात येणार असून वाहतुकीवेळी जीपीएस प्रणालीचा वापर केला जाणार आहे.बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्चदरम्यान होत आहे. यंदा विज्ञान शाखेसाठी सर्वाधिक सात लाख ६० हजार ४६ विद्यार्थी, कला शाखेसाठी तीन लाख ८१ हजार ९८२, वाणिज्य शाखेसाठी तीन लाख २९ हजार ९०५, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ३७ हजार २२६, आयटीआयसाठी चार हजार ७५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, की परीक्षा सुरक्षित वातावरणात होण्यासाठी संपूर्ण व्यवस्था करण्यात आली. यंदा पहिल्यांदाच प्रात्यक्षिक, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ऑनलाइन पद्धतीने भरून घेतले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी राज्य मंडळ स्तरावरून १० तर समुदेशकांची, विभागीय मंडळांमध्ये जिल्हानिहाय दोन याप्रमाणे समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शुल्क भरले नाही किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र देण्यास टाळाटाळ करू नये, अशा सूचना देण्यात आल्या होत्या.



मात्र, प्रवेशपत्र देण्यास टाळाटाळ केल्याच्या दोन तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांवर कारवाई केली जाणार आहे, असेही गोसावी यांनी सांगितले.यंदा राज्य मंडळाने अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण ऑनलाइन प्रणालीद्वारे नोंदवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रचलित पद्धतीच्या तुलनेत ऑनलाइन प्रणालीमुळे काम अधिक वेगाने होणार आहे. त्याचा परिणाम निकाल तयार करण्याच्या प्रक्रियेवरही होऊ शकतो. त्यामुळे मे अखेरीपर्यंत बारावीचा निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे.विद्यार्थ्यांना परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर १० मिनिटे वाढवून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी सकाळच्या सत्रात साडेदहा वाजता, दुपारच्या सत्रात अडीच वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहायचे आहे. परीक्षेची वेळ सुरू झाल्यावर प्रवेश दिला जाणार नाही, असे गोसावी यांनी सांगितले.राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या वारंवार आंदोलन करूनही मान्य झालेल्या नाहीत. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार घातल्याची माहिती कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे समन्वयक प्रा. मुकुंद आंदळकर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

# पुणे महानगरपालिकेला अर्थसंकल्पासाठी मुहुर्त सापडेना

## जमा आणि खर्चाचे आकडे जुळविण्याचे कामही शिल्लक आहे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे महापालिकेचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प करण्यासाठी विभागनिहाय बैठका झाल्या असल्या तरी अद्याप अंतिम स्वरूप आलेले नाही. जमा आणि खर्चाचे आकडे जुळविण्याचे कामही शिल्लक आहे. आयुक्त तथा प्रशासक विक्रम कुमार हे अर्थसंकल्प कधी मांडणार? याबाबत अधिकाऱ्यांनादेखील काहीच माहिती नाही. पुणे महापालिकेने यापूर्वी झालेल्या ठरावानुसार आयुक्तांनी १५ जानेवारीपर्यंत स्थायी समितीला अर्थसंकल्प सादर करणे आवश्यक असते. त्यानंतर स्थायी समितीचे अध्यक्ष त्यांच्या अधिकारात त्यामध्ये बदल करून सुधारित अर्थसंकल्प मुख्य सभेच्या मान्यतेसाठी सादर करतात. त्यावर नगरसेवकांमध्ये चर्चा झाल्यानंतर मुख्य सभेची मार्च महिन्यात अंतिम मान्यता मिळते, अशी सर्वसाधारण प्रक्रिया आहे. मात्र, महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी महापालिकेत नगरसेवक असताना देखील



अर्थसंकल्प मांडण्यास विलंब केला होता. त्यानंतर सलग दोन वर्षे प्रशासक राजवटीच अर्थसंकल्प मांडला गेला असल्याने त्यावर संपूर्णपणे प्रशासक म्हणून आयुक्तांचेच नियंत्रण आहे.फेब्रुवारी महिन्यात आयुक्तांनी अर्थसंकल्प तयार करण्यासाठी सर्व विभागांच्या बैठका घेतल्या आहेत. पण त्यापुढे काही झालेले नाही. लेखा व वित्त विभागातील काही कर्मचाऱ्यांकडून अर्थसंकल्पाचे बरेच काम शिल्लक आहे, अद्याप जमा व खर्चाचे आकडे जुळलेले नाहीत, असे नाव न छापण्याच्या अटीवर एका अधिकाऱ्याने सांगितले. तर नगरसचिव कार्यालयाला अद्याप अर्थसंकल्प स्थायी समितीसमोर मांडण्यासाठी पत्र देण्यात आलेले नाही. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे फेब्रुवारी महिना संपण्यापूर्वी अर्थसंकल्प स्थायी समिती व मुख्य सभेत मंजूर होणे आवश्यक आहे. दरम्यान, स्थायी समिती आणि मुख्य सभा ही आयुक्तांच्याच ताब्यात नसल्याने चर्चेशिवाय अर्थसंकल्प मंजूर होणार आहे. त्यामुळे यास वेळ लागणार नाही, असा दावा अधिकारी करत आहेत. यासंदर्भात आयुक्त विक्रम कुमार यांच्याशी संपर्क केला असता प्रतिसाद मिळाला नाही.पुणे महापालिकेचा अर्थसंकल्प थेट नागरिकांवर परिणाम करणारा असतो. त्यांच्या भागात कोणती कामे पुढील वर्षभरात होणार हे त्यांना त्यातून कळते. पण गेल्या दोन वर्षांपासून अर्थसंकल्पाला मंजुरी मिळाल्यानंतर त्याची प्रत ऑनलाइन टाकण्यास टाळाटाळ केली जात आहे. सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींना यासाठी वारंवार पाठपुरावा करावा लागतो.